पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ४६**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **बुधवार दि. ३१/१/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**विषय क्र. २०१२**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(४) अन्वये स्थायी समितीच्या विद्यमान सभासदांपैकी दि. १/३/२०१८ रोजी कार्यनिवृत्त होणाऱ्या आठ मा.सभासदांची नावे लॉट पध्दतीने निश्चित करणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. नसजा/७६१९ दि. १६/१/२०१८ चे पत्र.**

**उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा**

**विषय क्र. २०१३**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील क्षेत्रिय कार्यालयांकडील दि. १/१२/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ पर्यंतच्या कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. मआ/उआप–३/२९४४ दि.१७/१/२०१८ चे पत्र.

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. २०१४**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ५ यांच्या अखत्यारीतील माहे डिसेंबर २०१७ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परिमंडळ–५/८७५ दि.२०/१/२०१८ चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. २०१५**

**२४ बाय ७ समान पाणीपुरवठा योजने अंतर्गत यापूर्वी मनपाकडून २८१८ कोटींची काढण्यात आलेली निविदेच्या एस्टिमेटमध्ये तब्बल र.रू.२९० कोटी रूपयांची वाढ करणा-या या निविदेसाठी नेमण्यात आलेल्या सल्लागारास काळया यादीत टाकण्यात यावे व प्रकल्प सल्लागाराविरूध्द कडक कारवाई करण्याबाबत मा.अविनाश बागवे, मा.प्रिया गदादे, मा.रविंद्र धंगेकर, मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव व मा.साईनाथ बाबर यांचे दि.१५/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १३२१ दि. २१/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी जा.क्र. मआ/पापु/८३४ दि. १६/१/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी**

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२३/१/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०१६**

सिंहगड रस्ता–शास्त्री रस्ता–धायरी फाटा ते दांडेकर पुल ते अलका टॉकीज चौक, सारसबाग ते धायरी पुल पर्यंत ॲडग्रेड ब्लॉक बसविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ए.आर.कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ७,९९,९९,५७५/– पेक्षा ५.४०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७,५६,७९,५९७=९५ उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/८५८ दि. १७/१/२०१८ चे पत्र

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२३/१/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०१७**

पुणे पेठ कोथरुड स.नं. ८७/७ अ चे मिळकतीचे बक्षिसपत्र पुणे मनपास लिहून देणेस श्री.रामचंद्र नाना सुतार यांचे वारस तयार नसल्याने सदर क्षेत्र पुणे मनपाचे नावे मालकी हक्काने प्राप्त करुन घेणेकरीता प्राप्त कायदेशीर अभिप्रायानुसार मूळ मालक यांचे विरुध्द पार्ट परफॉरमन्सचा दावा दिवाणी न्यायालयात दाखल करणेकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८१ अन्वये मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/५७८ दि.३०/११/२०१७ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२३/१/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०१८**

मा.सौ.अर्चना पाटील यांचे दि. १०/१/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १९ क लोहियानगर व मोदीखाना, जुना मोटर चौक परिसरात वाहतुक विषयक पांढरे व पिवळे पट्टे मारणे व कॅटसआय बसविणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक, झेडई१६अे१०४/एसपी२-७९०, सिध्दार्थनगर पाण्याच्या टाक्या बसविणे | १० लाख | --- |
| **<u>नवीन सुचविलेले काम</u>**<br>प्रभाग क्र. १९ क लोहियानगर व मोदीखाना, जुना मोटर चौक परिसरात वाहतुक विषयक पांढरे व पिवळे पट्टे मारणे व कॅट्सआय बसविणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२३/१/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०१९**

पुणे पेठ बावधन खुर्द स.नं. १८/४+५ नवीन स.नं. १८/७ घर नं. ८५८ या मिळकतीमधून १५ मी.डी.पी. रस्त्यासाठी ताब्यात घेतलेल्या १०० चौ.मी. जागेच्या मालकी हक्काचे सदरी ७/१२ उताऱ्यावर पुणे महानगरपालिकेचे नावे नोंद झालेली असल्यामुळे नोंदणीकृत हस्तांतरण दस्तामध्ये नमूद केल्याप्रमाणे सन २०१७ च्या शिघ्रसिध्दगणकानुसार जागेचे मुल्यांकन र.रुपये २२,४१,६००/- भूसंपादन कायदा २०१३ च्या धोरणाप्रमाणे १००% होणारी दिलासा र.रुपये २२,४१,६००/- असे होणारी एकूण रक्कम रु. ४४,८३,२००/- श्री.मारुती बाबुराव अंबिलवादे यांना देण्यास म मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/८२७ दि.१५/१/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२३/१/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. २०२०**

पुणे महानगरपालिकेमार्फत पुणे शहरातून त्या त्या आर्थिक वर्षात परदेशात उच्च शिक्षण (पदवी नंतरच्या वैद्यकीय /अभियांत्रिकी /संगणकीय/व्यवस्थापन /विधी /वाणिज्य इ.) घेण्यासाठी जाणाऱ्या मागासवर्गीय एकूण ५ विद्यार्थ्यांना तसेच आर्थिक दुर्बल घटकातील पांच विद्यार्थांनाही प्रत्येकी र.रु.२ लाख एकदाच अर्थसहाय्य देणेसाठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा. आयुक्त यांचे जा. क्र. मआ/ सविवि/५३२, दि.१६/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र.१६८ दि.१०/१/२०१८ चा विचारासाठी.

**विषय क्र. २०२१**

पुणे शहरातील स्वच्छता मोहिमेअंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या येरवडा येथील बॅच मिक्स प्लान्टमध्ये 'टाकाऊ प्लास्टिक' वापरुन डांबरी मिक्स माल रस्ते तयार करणे करीता डाऊ केमिकल इंटरनॅशनल प्रा.लि. व रुद्र एनव्हायरोंमेंटल इंडिया लि. यांचे सहकार्य घेणेकरिता सामंजस्य करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/८७१ दि. १९/१/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २०२२**

पुणे महानगरपालिकेसाठी LEED for Cities या अंतर्गत (जी.बी.सी.आय.) ग्रीन बिझनेस सर्टिफिकेशन इन्स्टिटयुट या संस्थेकडून करुन घेण्यास नेमणुक करणेस व ५ वर्ष मुदतीसाठी रजिस्ट्रेशन व सर्टिफिकेशन चार्जेस असे एकूण र.रुपये ११,७६,५१९/– आदा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/शअ/८७९ दि. २२/१/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २०२३**

डेक्कन कॉलेज पद्व्युत्तर व संशोधन संस्था पुणे, या वास्तुचे जतन व संवर्धनाचे काम करण्यास र. रू. ५० लक्ष पुणे महानगरपालिकेतर्फे (महापौर निधीतून) खर्च करण्यासाठी मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/८९२ दि.२३/१/२०१८ चे पत्र

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**